महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय
कल्याण प. -४२१३०१

ठाणे पोलीस आयुक्तालय

Email ID: cp.thane.dcpzone3@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्र:०२५१/२३१३४१३

प्रेस नोट

दि.१९/०७/२०२५

परिमंडळ ३ कल्याण मध्ये मेफेड्रॉन (एम.डी) व 'गांजा' अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणाऱ्या आरोपीतांस अटक

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण यांचे विशेष कारवाई पथकाने व खडकपाडा पोलीस ठाणे यांनी परिमंडळात बेकायदेशीर अंमली पदार्थ विक्री करणारे विरूध्द खालील प्रमाणे अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्यात केलेली आहे.

१) दि.१८/०७/२०२५ रोजी बाजारपेठ पोलीस ठाणे हददीत १६.४५ वा सुमारास फोर्टीस हॉस्पीटलचे समोर ए.पी.एम.सी मार्केटचे पाठीमागील रोडवर कल्याण प.येथे विशेष कारवाई पथक गस्त करत असताना दोन इसम मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने त्याबाबत अधिक तपास केले असता त्याच्याकडे **११० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी) अंदाजे रू.२२,००,०००/— किंमतीचा** हा अंमली पदार्थ मिळुन आले आहे. आरोपी नामे १) मोहम्मद कैफ मन्सुर शेख,वय २४ वर्षे रा.मेहेक मंजील रूम नं.९ २ मजला बैलबाजार कल्याण प. व २) फरदीन आसीफ शेख वय २४ वर्षे रा.ड्रिम कॉम्पलेक्स,बी ०१ रूम नं.२ कोनगांव भिंवडी यास ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीतांवर बाजारपेठ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४३७/२०२५ एन.डी.पी.एस कायदा कलम ८(क),२२(क) २९ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास चालु आहे.

(२) दि.१७/०७/२०२५ रोजी खडकपाडा पोलीस ठाणे हददीत १७.४५ वा सुमारास योगी धाम, अमृतधाम सोसायटीकडे जाणारे रोडवर,साई दर्शन ढाब्यासमोर, वालधुनी नदीचे बाजुला खडकपाडा कल्याण प या ठिकाणी इसम नामे १)रवि शिवाजी गवळी वय.३० वर्षे रा.अनुपमनगर जयदुर्गे चाळ,मोकळे मैदानाचे बाजुला भाडोत्री खोली खडकपाडा कल्याण प.जि.ठाणे हे त्यांच्या ताब्यात **११२० ग्रॅम इतका अंदाजे रू.२५,०००/—** किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने आरोपींतावर खडकपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.ा ५९८/२०२५ एन.डी.पी.एस कायदा कलम ८(क),२०(ब),ा(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास चालु आहे.

सदरची कामगिरी परिमंडळ ३ कल्याण विशेष कारवाई पथक व पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे केली आहे. अशा प्रकारे परिमंडळ ३ कल्याण मध्ये अंमली पदार्थ विक्री विरूध्द कारवाई सुरू राहणार आहे.